डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ०६ /२०२६ दि. १२ /०१/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

ज्याअर्थी, डोंबिवली वाहतूक उपविभागाचे हद्दीत **कल्याण डोबिंवली महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने लोकमान्य टिळक विदयालय शाळा नं. २०, रेतीबंदर रोड, डोंबिवली पश्चिम येथे स्ट्रांगरूम असुन सदर ठिकाणाहुन निवडणुकीच्या ई व्ही एम मशिन वाटप तसेच मतदान झाल्यानंतर ई व्ही एम मशिन सदर ठिकाणी जमा होणार आहेत. दि. १६/०१/२०२६ रोजी सदर ठिकाणी मतमोजणी होणार आहे.** सदर परिसरात वाहतुकीचे रोड असुन वाहनांची त्या ठिकाणाहुन मोठया प्रमाणात वर्दळ असते तसेच सदर रस्ता हा अरुंद असल्याने वाहतुक कोंडीची समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद–	**१)** रेतीबंदर रोडवरून रेतीबंदर चौकमार्गे उमेशनगरकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **रेतीबंदर चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग–	सदरची वाहने रेतीबंदर क्रॉस रोड, गावदेवी मंदीर मार्गे अथवा दिनदयाळ रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद–	**२)** रेतीबंदर रोड, घनशाम गुप्ते रोड क्रॉस रोड शेजारी ओम साई गणेश सोसायटी जवळ रेतीबंदर चौकाच्या दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना रेतीबंदर चौक येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग–	सदरची वाहने घनशाम गुप्ते रोड, रेतीबंदर क्रॉस रोड अथवा म. फुले रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना **दिनांक १४/०१/२०२६ रोजी सकाळी ०९:०० ते सायंकाळी १८:०० वा.** तसेच **दिनांक १५/०१/२०२६ रोजी सायंकाळी १८:०० ते दि. १६/०१/२०२६ रोजीची मतमोजणी प्रक्रिया पुर्ण होईपावेतो** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण, विशेष शाखा, ठाणे
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण

नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

प्रत :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे

२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत :— स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग, पोनि डोंबिवली, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर